**महाराष्ट्र शासन**

E-mail id : sd4.sesd-mh@gov.in

अत्यंत तातडीचे

क्रमांक: संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१०६/एसडी-४.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २० मार्च,२०२०.

प्रति,

१) आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे
२) शिक्षण संचालक (प्राथमिक)/ (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य,पुणे
३) संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण),पुणे
४) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
५) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक)

**विषय : करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

**संदर्भ :** १. प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दिनांक १४ मार्च, १५ मार्च व १६ मार्च,२०२०
२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.व का.), दिनांक १८ मार्च,२०२०.
३. शासनाचे समक्रमांकाचे दिनांक १४ मार्च,२०२० व दिनांक १९ मार्च,२०२० चे पत्र.

राज्यात करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून शासनाने राज्यातील शाळा/कनिष्ठ महाविद्यालय दिनांक ३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

२. राज्यातील शासकीय/खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/विना अनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत इयत्ता १ ली ते ८ वी च्या अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांची एप्रिल,२०२० च्या पहिल्या आठवड्यात संकलीत मुल्यमापन चाचणी २ होणे नियोजित होते. तथापि सद्यस्थितीत दिनांक ३१ मार्च,२०२० पर्यंत शाळा बंद ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

३. उपरोक्त विषयांकित बाबीचा विचार करता शासन पुढील निर्देश देत आहे.

अ) राज्यातील शासकीय/खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/विना अनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत **इयत्ता १ ली ते ८ वी च्या परीक्षा रद्द करण्यात येत असून सातत्यपूर्ण सर्वकष मुल्यमापन अंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांचे वर्षभर आकारिक व साकारिक मुल्यमापन करण्यात येत असते त्या आधारावर विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात यावा.**

Scanned by CamScanner

**ब)** राज्यातील शासकीय/खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/विना अनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत **इयत्ता ९ वी व ११ वी ची परीक्षा १५ एप्रिल,२०२० नंतर घेण्यात यावी.**

**क)** राज्यातील शासकीय/खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/विना अनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत **सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ३१ मार्च,२०२० पर्यंत (एसएससी बोर्ड परीक्षेशी संबंधित कामे वगळून) घरातून कामे करण्याची परवानगी देण्यात येत आहे.**

**ड) एसएससी बोर्ड च्या परीक्षा वेळापत्रकानुसारच घेतल्या जातील** तथापि **सदर परीक्षेनंतर** एसएससी बोर्ड परीक्षेसंबंधी काम करणाऱ्या राज्यातील शासकीय/खाजगी व्यवस्थापनाच्या अनुदानित/विना अनुदानित/स्वयं अर्थसहाय्यीत **शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ३१ मार्च,२०२० पर्यंत घरातुन काम करण्याची परवानगी देण्यात येत आहे.**

तरी उपरोक्त सूचना आपल्या अधिपत्याखालील शाळांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

(राजेंद्र पवार)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री,शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
४) मा.अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण यांचे स्वीय्य सहाय्यक
५) मा.अपर मुख्य सचिव,पंचायत राज व ग्रामविकास विभाग यांचे स्वीय्य सहाय्यक
६) राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई
७) अध्यक्ष,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,महाराष्ट्र राज्य,पुणे
८) अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे
९) महासंचालक,माहिती व जनसंपर्क कार्यालय,मंत्रालय,मुंबई
१०) जिल्हाधिकारी (सर्व)
११) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

Scanned by CamScanner